महा न्यूज & व्ह्यूज
17 SEP 2025

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimali Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# संविधानातील मूल्यतत्त्वे समाजापर्यंत पोहोचणे आवश्यक : डॉ. श्रीकृष्ण महाजन


कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):

संविधानातील मूल्ये समाजापर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्या दृष्टीने संविधान दूतांनी काम करणे अभिप्रेत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संविधान दूत' कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषक म्हणून ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. महाजन म्हणाले, तरुणाईला योग्य दिशा मिळाली, तर त्यांचे जीवन योग्यरीत्या घडते आणि पर्यायाने देश घडतो. वादाने प्रश्न वाढत जातात, मात्र समंजसपणा व चर्चेच्या मार्गाने प्रश्न सुटतात. तेव्हा संविधान दूतांनी सामंजस्याच्या मार्गाने संविधानातील मूल्यतत्त्वे समाजातील तळागाळापर्यंत पोहचविण्याचे काम करावे.

ते म्हणाले, भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता यांसारखी उदात्त मानवी मूल्ये



समाजात दृढपणे रुजावीत व भारतीय संविधानाबद्दल व्यापक जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्यावतीने भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ''संविधानदूत'' ही महत्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील एका विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीची संविधानदूत म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मिळालेल्या ज्ञानाचा वापर आपल्या जीवनामध्ये केला पाहिजे. शिक्षणाने आयुष्य बदलते. आजचा विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक असून या कार्यशाळेमध्ये मिळालेल्या ज्ञानाचा वापर आपण राष्ट्र उभारणीसाठी केला पाहिजे. यावेळी डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

कार्यशाळेच्या 'भारतीय संविधानाची ओळख' या पहिल्या सत्रात प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील यांनी 'संविधान व त्याचे महत्त्व' आणि 'भारतीय संविधानाची प्रस्तावना व संवैधानिक मूल्ये' या विषयावर तर प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी 'लोकशाही, समता आणि न्याय' आणि 'मूलभूत हक्क व कर्तव्ये' या विषयावर मार्गदर्शन केले. 'संविधान मूल्यांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व' या दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. अविनाश भाले यांनी संविधान दूत म्हणून समाजामध्ये प्रत्यक्ष कसे काम करावे, यासबंधी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. भारती पाटील, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. दत्ता जाधव, डॉ. लखन भोगम, जॉर्ज क्रुझ आदी उपस्थित होते.

महा न्यूज & व्ह्यूज
17 SEP 2025

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# कलेतील ज्ञान हे पवित्र व प्रवाही असलं पाहिजे : डॉ.स्वाती दैठणकर


## नर्तना उत्सव २०२५ ची सांगता

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

नर्तना स्कूल ऑफ डान्स आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत 'नर्तना उत्सव २०२५' चे अधिविभागाच्या सभागृहात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मंचावर शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव मा. व्ही.एन.शिंदे, वित्त व लेखाधिकारी मा.डॉ. सुहासिनी पाटील, नृत्य मार्गदर्शिका व प्रसिद्ध भरतनाट्यम नृत्यांगना डॉ. स्वाती दैठणकर, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई नर्तना स्कूलच्या संचालिका व मार्गदर्शिका श्रीमती कविता नायर या उपस्थित होत्या.

या महोत्सवामध्ये दैठणकर यांचे भरतनाट्यम नृत्याविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. या प्रसंगी बोलताना त्या म्हणल्या की 'कलेतील ज्ञान हे पवित्र व प्रवाही असलं पाहिजे, आपल्या गुरूंवर श्रद्धा असली पाहिजे, केवळ प्रसिद्धीची अपेक्षा न करता विद्यार्थ्यांनी सातत्याने नृत्यसाधना केली पाहिजे'. यावेळी नटराजाच्या मूर्तीतील अर्थ अतिशय ओघवत्या शैलीत कथन केला. त्यांनी शबरी ही व्यक्तिरेखा नृत्यातून साकारली त्यावेळी उपस्थितांनी त्याला उत्तम दाद दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव मा.डॉ.व्ही.एन शिंदे यांच्या प्रमुख उपस्थिती लाभली. या महोत्सवाला शुभेच्छा देताना त्यांनी पु.शी. रेगे यांच्या सावित्री कादंबरीचा संदर्भ देत त्यातील लहान मुलगी ज्याप्रमाणे स्वत:च्या आनंदासाठी स्वत:च मोर बनू पाहते तसे कलाकाराने असले पाहिजे असे मत व्यक्त केले तर या कार्यक्रमासाठी विशेष अतिथि म्हणून उपस्थित शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारी मा.डॉ. सुहासिनी पाटील यांनी मानसिक आरोग्यासाठी संगीत व नृत्य शिकणे आवश्यक कसे आहे हे सांगीतले .



या महोत्सवात नृत्य शिबिरात सहभागी नंदिता नायर, वैभवी चोपडे, स्वराली कडू, दीक्षा मोरे,श्रीमती नीलम येसाटे, आर्या उपाध्याय, समृद्धी शिंदे, वंशिका मुसळे, गीतीका पर्चानी, राशी देशपांडे, राधिका संजय पवार, स्वरा श्रीधर काळभैरव, अक्षरा खाबिया, एलेन रॉड्रिग्स, ऋतिक्का मगदुम, स्वरा कुसळे, प्रीती रमेश कुंभार, रुजवी पाटील, समिधा सौरभ प्रभुदेसाई, अपूर्वा घाटगे, समीक्षा संदीप घोरपडे, समीक्षा सोमनाथ शिंदे, युथिका अरविंद, मीनल देसाई, रुजवेदी संतोश चिकणे, समृद्धी अमर जावरे, आकांक्षा संजय रासळ यांनी भरतनाट्यम नृत्यातील नरसिंह कृती, अभंग आदी अनेक प्रकार सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मान्यवर, कलाकार, सहभागी विद्यार्थी तसेच कला-रसिक प्रेक्षक यांचे आयोजकांनी मनः पूर्वक आभार मानले.

पुण्यनगरी

# भाषा मानवाला सुसंस्कृत बनवते : डॉ. शरणकुमार लिंबाळे

**कोल्हापूर : कोल्हापूर**

भाषा माणसाला सुसंस्कृत बनवते, अन्य पशुमात्रांपासून त्याला वेगळे करते. भाषेचे मानवी विकासामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे, असे प्रतिपादन डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी केले. ते हिंदी विभाग व यूको बँकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिंदी पंधरवड्याच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते.

सरस्वती पुरस्कारप्राप्त लेखक शरणकुमार लिंबाळे म्हणाले, आपण भाषिक वादात न अडकता बहुभाषिक बनले पाहिजे. लेखक न्यायासाठी लिहितो, समाजाला स्वस्थ, सुंदर बनवणे हे त्याचे ध्येय असते. दलित साहित्याने भारतीय साहित्याला विचार करण्यास व वास्तववादी साहित्य लिहिण्यास भाग पाडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी हिंदी भाषेचा वाढता आलेख स्पष्ट करत उपस्थितांना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. गीता दोडमणी, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुषमा चौगले, प्रतीक्षा ठुंबरे आदी उपस्थित होते.

1 7 SEP 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘उच्च शिक्षण ’च्या सर्वेक्षणात वस्तुनिष्ठ माहितीला महत्त्व

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के ; विद्यापीठात अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय उच्च शिक्षणविषयक सर्वेक्षणामध्ये (ए.आय.एस.एच.ई.) वस्तुनिष्ठ माहितीला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी या संदर्भातील माहिती जबाबदारीने भरावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचा सांख्यिकी कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ‘एआयएसएचई’च्या महाविद्यालयीन नोडल अधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात उपस्थितांना संबोधित करताना कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आज राष्ट्रीय पातळीवर अखिल भारतीय उच्च शिक्षणविषयक सर्वेक्षण अहवाल हाच अधिकृत माहितीचा स्रोत, दस्तावेज उपलब्ध आहे. त्यामुळे महाविद्यालये जितक्या जबाबदारीने वस्तुनिष्ठ माहिती येथे भरतील, तितका विश्वासार्ह डेटा देशपातळीवर उपलब्ध होईल. या माहितीच्या आधारेच राष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षणविषयक धोरणात्मक निर्णय घेतले जातात. केंद्रीय स्तरावर परवानगी घेऊन राज्यस्तरीय अहवाल प्रकाशित करता येईल का, या दृष्टीनेही नजीकच्या काळात विचार केला जावा. तसेच, पुढे विद्यापीठस्तरीय अहवाल निर्मिती करून या माहितीचा विद्यापीठ स्तरावरील विविध धोरणे, योजना आखण्यासाठी विनियोग करता येईल का, या दृष्टीनेही विचार करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर गुणवत्ता अधिकारी सुभाष माने यांनी आभार मानले. कार्यशाळेस २२१ संलग्नित महाविद्यालयांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# बँकिंग क्षेत्रातील नवसंकल्पना आत्मसात करा : प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन




**कोगे : प्रतिनिधी**

डिजिटल बँकिंगमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील दरी कमी झाली असून, विद्यार्थ्यांनी बँकिंग क्षेत्रातील नवसंकल्पना आत्मसात कराव्यात. बँकिंग क्षेत्राकडे वळावे, असे प्रतिपादन प्रभारी अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालय, गगनबावडा आणि शिवाजी विद्यापीठाच्या द वेस्टर्न बँक्स लेट आर. एन. गोडबोले अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रोल ऑफ डिजिटल बँकिंग इन इंडियन फिनान्शियल सिस्टम' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक आयडीबीआय बँक मुंबई मुख्य शाखेचे असिस्टंट जनरल मॅनेजर डॉ. सुशांत सुतार यांनी बँकिंग क्षेत्रातील डिजिटल आणि तंत्रज्ञान या संबंधित नवसंकल्पना याविषयी मार्गदर्शन केले. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे बँकिंग क्षेत्राचे बदललेले स्वरूप कसे आहे व कसे असेल, याबाबत त्यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतीश देसाई म्हणाले, ग्रामीण भागातील बँकांची स्थिती मजबूत असून, सामान्याला लाभ होत आहे.

यावेळी सचिव डॉ. विद्या देसाई, प्राचार्य डॉ. टी. एम. पाटील, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. एस. एस. पानारी, प्रा. आदिनाथ कांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया घाटगे यांनी, तर आभार प्रा. फरास यांनी मानले.

17 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उच्च शिक्षण सर्वेक्षणात जबाबदारीने माहिती भरावी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठात प्रशिक्षण कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : 'अखिल भारतीय उच्चशिक्षणविषयक सर्वेक्षणामध्ये (ए.आय.एस.एच.ई.) वस्तुनिष्ठ माहितीला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी या संदर्भातील माहिती जबाबदारीने भरावी', असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा सांख्यिकी कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे आयोजित एआयएसएचईच्या महाविद्यालयीन नोडल अधिकाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत मंगळवारी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डावीकडून सुभाष माने, अभिजित रेडेकर, उत्तम सकट उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'राष्ट्रीय पातळीवर आज अखिल भारतीय उच्चशिक्षणविषयक सर्वेक्षण अहवाल हाच अधिकृत माहितीचा स्रोत, दस्तावेज उपलब्ध आहे. त्यामुळे महाविद्यालये जितक्या जबाबदारीने वस्तुनिष्ठ माहिती येथे भरतील, तितका विश्वासार्ह डेटा देशपातळीवर उपलब्ध होईल. या माहितीच्या आधारेच राष्ट्रीय पातळीवर उच्चशिक्षणविषयक धोरणात्मक निर्णय घेतले जातात.

केंद्रीयस्तरावर परवानगी घेऊन आपल्याला राज्यस्तरीय अहवाल प्रकाशित करता येईल का, या दृष्टीनेही नजीकच्या काळात विचार केला जावा. तसेच पुढे विद्यापीठस्तरीय अहवाल निर्मिती करून या माहितीचा विद्यापीठस्तरावरील विविध धोरणे, योजना आखण्यासाठी विनियोग करता येईल का, या दृष्टीनेही विचार करण्याची आवश्यकता आहे.'

कार्यशाळेत दुपारच्या सत्रात राज्य शासनाच्या उच्चशिक्षण संचालनालयाचे सांख्यिकी अधिकारी स्वप्नील कोरडे आणि विद्यापीठाच्या संगणक केंद्राचे संचालक तथा सांख्यिकी अधिकारी अभिजित रेडेकर यांनी मार्गदर्शन केले आणि उपस्थितांचे शंका समाधान केले. उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. गुणवत्ता अधिकारी सुभाष माने यांनी आभार मानले. या कार्यशाळेस २२१ संलग्नित महाविद्यालयांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

### ■ शंभर टक्के माहिती भरणारे विद्यापीठ

'शिवाजी विद्यापीठ एआयएसएचई पोर्टलवर गेल्या १३ वर्षांपासून सलगपणे शंभर टक्के माहिती भरणारे विद्यापीठ आहे. या कामी महाविद्यालयांनी केलेले सहकार्य मोलाचे ठरले असल्याचे रेडेकर यांनी सांगितले.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
17 SEP 2025

# विद्यापीठात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ. अभिधा धुमटकर, समिधा धुमटकर, डॉ. प्रतिमा देसाई.

- डॉ. अभिधा धुमटकर व समिधा धुमटकर यांची प्रमुख उपस्थित होती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील यु.जी.सी. स्किम पर्सन विथ डिसॅबिलिटीज् आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्रामार्फत विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदवला.

डॉ. अभिधा धुमटकर आणि समिधा धुमटकर या उपस्थित होत्या. डॉ. धुमटकर यांना संशोधनासाठी लंडनची चार्ल्स वालेस फेलोशिप मिळाली आहे. त्यांना एकूण चौदा विदेशी भाषा अवगत आहेत. सध्या त्या मुंबई येथील साठ्ये महाविद्यालयात इतिहास विभागाच्या प्रमुख आहेत. यावेळी त्यांनी आपले अनुभवकथन करताना आपला शैक्षणिक व संशोधनाचा प्रवास मांडला. त्यामध्ये येणाऱ्या अडचणींवर मात कशी केली, तेही सांगितले. समिधा धुमटकर या देखील अंध असून त्या एस. एन.डी.टी. महिला विद्यापीठात दूरध्वनी चालक आहेत. स्वावलंबनातून आपल्या व्यक्तीमत्त्वात कसा बदल घडवून आणता येऊ शकतो, हे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. सुप्रिया वडार यांनी सूत्रसंचालन केले. सतीश नवले यांनी आभार मानले. विद्यापीठ व कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षक, दिव्यांग विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरूण भारत






कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत सुभाष माने, अभिजीत रेडेकर आणि डॉ. उत्तम सकट.

# उच्च शिक्षणविषयक सर्व्हेक्षणात वस्तुनिष्ठ माहितीला महत्त्व

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

अखिल भारतीय उच्च शिक्षणविषयक सर्वेक्षणामध्ये (ए.आय.एस.एच.ई.) वस्तुनिष्ठ माहितीला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी या संदर्भातील माहिती जबाबदारीने भरावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा सांख्यिकी कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने एआयएसएचईच्या महाविद्यालयीन नोडल अधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय पातळीवर अखिल भारतीय उच्चशिक्षणविषयक सर्वेक्षण अहवाल हाच अधिकृत माहितीचा स्रोत, दस्तावेज उपलब्ध आहे. त्यामुळे महाविद्यालये जितक्या जबाबदारीने वस्तुनिष्ठ माहिती येथे भरतील, तितका विश्वासार्ह डेटा देशपातळीवर उपलब्ध होईल.

विद्यापीठाच्या संगणक केंद्राचे संचालक तथा सांख्यिकी अधिकारी अभिजीत रेडेकर यांनी, शिवाजी विद्यापीठ एआयएसएचई पोर्टलवर गेल्या १३ वर्षांपासून सलगपणे १०० टक्के माहिती भरणारे विद्यापीठ असून या कामी महाविद्यालयांनी केलेले सहकार्य मोलाचे ठरले असल्याचे सांगितले. राज्य शासनाच्या उच्चशिक्षण संचालनालयाचे सांख्यिकी अधिकारी स्वप्नील कोरडे यांनी मार्गदर्शन केले. उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. गुणवत्ता अधिकारी सुभाष माने यांनी आभार मानले. यावेळी २२१ संलग्नित महाविद्यालयांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# विद्यापीठात आजपासून विकसित भारत विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर** : विकसित भारत २०४७ या केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान दररोज सायंकाळी ५ वाजता 'विकसित भारत संवाद ऑनलाईन व्याख्यानमाला" आयोजित केली आहे. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्ती विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहे.

यामध्ये सेवानिवृत्त एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी (संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता), सेवानिवृत्त राजदूत लक्ष्मी पुरी (भारतातील लोकशाहीचे पुनर्जागरण : मोदी युगाची क्रांती), डॉ. मनीष दाभाडे (परराष्ट्र धोरण आणि विकसित भारत), आशिष चांदोरकर (मोदी कालखंडातील आर्थिक सुधारणा आणि विकसित भारत) आणि डॉ. शान्तिश्री पंडित (शिक्षणातून कौशल्य विकास : विकसित भारताचा आधार) या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत.

तरुण भारत

# ‘भाषा माणसाला सुसंस्कृत बनवते’

कोल्हापूर : भाषेचे मानवी विकासामध्ये महत्वपूर्ण स्थान आहे. भाषा माणसाला सुसंस्कृत बनवते, असे मत लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी व्यक्त केले. हिंदी विभाग व यूको बँकेच्या संयुक्त विद्यमाने हिंदी पखवाड्याचे उद्‌घाटन सरस्वती पुरस्कार प्राप्त लेखक शरणकुमार लिंबाळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रकांत लंगरे होते. लिंबाळे म्हणाले, आपण भाषिक वादात न अडकता बहुभाषिक बनले पाहिजे, असे भाषेचे महत्व सांगतानाच लेखक न्यायासाठी लिहितो. समाजाला स्वस्थ, सुंदर बनवणे हे त्याचे ध्येय असते. दलित साहित्याने भारतीय साहित्याला विचार करण्यास व वास्तववादी साहित्य लिहिण्यास भाग पाडले आहे. प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. गीता दोडमणी, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुषमा चौगले, प्रतीक्षा ठुंबरे यांच्यासह विद्यार्थी आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.